**सं.फौ.ख.नं.८३९/२०२४**
**निशाणी क्र. १४ लगत**

**आरोपीतर्फे फिर्यादीचा उलटतपास विधीज्ञ श्री. आर.व्ही.बोराटे यांचेमार्फत सुरु–**

आरोपी व माझ्या पतीची पूर्वीपासून ओळख होती. आरोपी व माझ्या पतीची कोणत्या साली ओळख झाली याबाबत मला निश्चीत सांगता येत नाही. आरोपीचे मित्र विनायक अनंत महाले यांच्याशी माझी ओळख नाही. विनायक अनंत महाले यांनी कोणत्या बँकेचे कर्ज घेतले होते व किती रक्कमेचे कर्ज होते याबाबत मला माहिती नाही. बँकेने विनायक महाले यांच्या विरोधात रक्कम वसुलीसाठी कोणत्या न्यायालयात केस दाखल केली होती याबाबत मला माहिती नाही. विनायक महाले यांच्या कर्ज प्रकरणाला कोण जामीनदार होता याबाबत मला माहिती नाही. आरोपीने र.रु.२,५०,०००/- हे आमच्या दोघांकडून घेतले आहेत. आरोपीने पतसंस्थेची नोटीस आल्यामुळे त्यांना पैशाची आवश्यकता आहे असे सांगुन आमच्या दोघांकडे पैशाची मागणी केली. हे म्हणणे खरे आहे की, विनायक महाले याच्या नावे फ्लॅट क्र.२, यश अपार्टमेंट, बुधवार पेठ, फलटण येथे आहे. हे म्हणणे खरे आहे की, र.रु.२,५०,०००/- च्या बदल्यात यश अपार्टमेंट मधील अनंत महाले यांच्या नावचा फ्लॅट क्र.२ हा कायदेशीर पुर्तता करुन रक्कमेच्या बदल्यात देण्याचा ठरला होता. ठरावाप्रमाणे आरोपीला अनंत महाले यांच्या मालकीचा फ्लॅट आमच्या नावावर करण्याकरीता कोणत्या अडचणी आल्या याबाबत मला माहिती नाही व त्याबाबत आम्ही माहिती घेण्याचा प्रयत्न केला नाही. ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे अनंत महाले यांच्या मालकीचा फ्लॅट आमच्या नावावर करण्याच्या मागणीसाठी आम्ही आरोपीकडे नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, र.रु.२,५०,०००/- हे अनंत महाले यांच्या नावचा फ्लॅट हा आम्हाला मिळणेकरीता आरोपीला आम्ही पैसे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, फ्लॅट नावावरती करुन देणे शक्य झाले नाही तर र.रु.२,५०,०००/- ला व त्यावरील बँकेच्या नियमाप्रमाणे येणारे व्याज आम्हाला तो देणार होता. हे म्हणणे खरे आहे की, फ्लॅट दिला नाही म्हणून आम्ही पैशाच्या मागणीकरीता वेगळी नोटीस आरोपीला दिली नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, आम्ही तोंडी मागणी केली होती. आरोपीकडे आम्ही पैशाची तोंडी मागणी कोणत्या

तारखेला, कोणत्या दिवशी व कोणत्या वेळी केली हे आता मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही तोंडी मागणी केली नसल्यामुळे मला तारीख, वार व वेळ सांगता येत नाही. आरोपी हा ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे वागत नाही व आम्हाला पैसे देखील देत नाही यासंदर्भात आम्ही कोठेही पोलिस स्टेशनला तक्रार केलेली नाही. आरोपीने आम्हाला धनादेश दिल्याची तारीख ही ७ जानेवारी २०२४ अशी आहे. दि.०७ जानेवारी २०२४ रोजी आरोपीकडून र.रु.२,५०,०००/- येणे बाकी होते. हे म्हणणे खरे आहे की, ॲड सलिम शेख यांच्याकडून आरोपी देणे लागत असलेल्या रक्कमेपैकी र.रु.५०,०००/- मला मिळाले. हे म्हणणे खरे आहे की, सलिम शेख यांच्याकडून मिळालेले र.रु.५०,०००/- हे कथीत धनादेश भरण्यापूर्वी मिळाले होते. र.रु.५०,०००/- सलिम शेख यांच्याकडून मिळाल्यानंतर आरोपीकडून मला र.रु.२,२५,०००/- येणे होते. र.रु.२,२५,०००/- रक्कमेइतपत बँकेच्या कोणत्या नियमाप्रमाणे व किती टक्केवारीने व्याज आकारणी केली याबाबत मी सांगु शकत नाही. कथीत धनादेश हा दि.७ जानेवारी २०२४ पासून २५ जानेवारी २०२४ पर्यंत आमच्या ताब्यात होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.०१.२०२४ रोजी आरोपी हा र.रु.२,२५,०००/- देणे लागत नव्हता. आरोपीने आमच्याकडून २,५०,०००/- उसने घेतले होते.

प्रश्न- आरोपी हे विनायक अनंत महाले यांच्या नावचा फ्लॅट हा तुम्हाला तुमच्या नावे करुन दयायला सदैव तयार होते?

उत्तर- आरोपी हे सदर व्यवहार झाल्यानंतर १ वर्षापर्यंत दयायला तयार होते. १ वर्षानंतर त्यांनी त्याबाबत काही बोलणी केली नाही.

हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने १ वर्षापर्यंत आम्हाला विनायक अनंत महाले यांच्या नावावरील फ्लॅट आमच्या नावावर करुन दिला नाही व पैसेही दिले नाहीत याबाबत आम्ही कोठेही पोलिस स्टेशनला तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून जादा पैसे उकळण्याच्या उद्देशाने आम्ही चेक वटणावळीसाठी भरला. हे म्हणणे खरे नाही की, दि.७ जानेवारी २०२४ रोजी मी व माझ्या दोन्ही मुलांनी आरोपीकडून मारहाण करुन जबरदस्तीने चेक घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.०१.२०२४ रोजी आरोपीने माझ्या व माझ्या दोन्ही मुलांविरुद्ध फलटण शहर पोलिस स्टेशन यथे फिर्याद एन.सी.आर.क्र.१०/२०२४ दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, केस दाखल करण्यापूर्वी आम्ही आरोपीला कोणतीही नोटीस पाठविली नाही.

प्रश्न- धनादेशावरील रक्कम २,२५,०००/- व २,२५,०००/- होण्याइतपत व्याज आकारणी किती टक्के व कोणत्या रक्कमेवर केली आहे याबाबत तुमच्या सरतपासात व फिर्यादीत कोठेही नमुद नाही?

उत्तर- सदर चेकवरील व्याजाची आकारणी आम्ही केलेली नाही. सदर रक्कमेचा चेक हा आरोपीने रक्कम टाकून आम्हाला दिलेला आहे.

आता मला नि.क्र.२६ वरील धनादेश दाखविण्यात आला. त्यावरील आरोपीची सही केलेली शाई व इतर लिहिलेल्या मजकूराची शाई यामध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने धनादेशाची रक्कम लिहून चेक दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.०१.२०२४ व दि.२५.०१.२०२४ रोजी आरोपी हा धनादेशावरील रक्कम देणे लागत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा ठरल्या व्यवहाराप्रमाणे विनायक अनंत महाले यांच्या नावावरील फ्लॅट देण्यास तयार असताना देखील आरोपीकडून जबरदस्तीने सदरचा चेक मी व माझ्या मुलांनी घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जबरदस्तीने घेतलेल्या धनादेशाचा दुर उपयोग करुन आरोपी विरुद्ध खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर व दाखल केलेली सर्व कागदपत्रे खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (श्रीमती के.आर.पाटील)

ता. १४/०२/२०२५ ६वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण